**Spl.C.S.No. 100/2017**
**Bhagatsingh & Oth. .Vs. Arun & Oth**
**Exh.120**

**Witness no.1 – Vimal**

**प्रतिवादी साक्षीदार क. १ चा सरतपास प्रतिवादी तर्फे ॲड. श्री एम.एम. पिंपळकर मार्फत शपथेवर सुरू–**

१. मी शपथेवर खरे सांगते की मी दाखल केलेले शपथपत्र **नि. १२०** वर माझी सही असून त्यावर माझे वकीलांची सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे.

२. मला दाखविलेले इसारपत्र नि. ४६ हे तेच आहे जे मी शपथपत्रात नमुद केले आहे, त्यावर माझे पतीची स्वाक्षरी आहे व ती मी ओळखते. नोटीस नि. ५६ व ५७ हे माझे विद्वान वकीलांमार्फत पाठविण्यात आले होते. त्यावर त्यांची स्वाक्षरी आहे. मला नि. ६१ बद्दल काही सांगता येत नाही कारण माझे पतीने मला त्याबद्दल काही सांगीतले नव्हते. मला परवानगी रद्द झाल्या बाबतचे नि. ६२ बाबत काही माहिती नाही. चेक नि. ५५ माझे पतीने हा वादी सोसायटीस दिला होता. मला दाखविण्यात आलेला नोटीस नि. १०४ हे माझे विद्वान वकीलांमार्फत पाठविण्यात आले होते. त्यावर त्यांची स्वाक्षरी आहे. मला व्हॉवचर नि. ९३ व १०२ बाबत माहिती नाही. मला दाखविण्यात आलेला नोटीस नि. ९७ हे माझे विद्वान वकीलांमार्फत पाठविण्यात आले होते. त्यावर त्यांची स्वाक्षरी आहे. मला डिड ऑफ डिक्लरेशन नि. १०३ बाबत माहिती नाही. मला अजून काही सांगावयाचे नाही.

**उलट तपास वादी तर्फे विद्वान वकील श्री नितीन भिशीकर यांच्या मार्फत सुरू–**

३. माझे शिक्षण इयत्ता ९ वी पर्यंत झाले आहे. मी कधीही बांधकामाच्या व्यवसायात राहिलेले नाही. मी माझे पतीला त्यांच्या व्यवसायात कधीही मदत केलेली नाही. हे म्हणणे बरोबर नाही की मला वादी व माझे पतीमध्ये झालेल्या व्यवहाराबाबत

निश्चित माहिती नाही. वादी सोसायटी हे माझे पतीकडून ऑफिससाठी जागा खरेदी करणार होते. हे म्हणणे बरोबर आहे की वादी सोसायटी व माझे पतीमध्ये व्यवहार झाला तेंव्हा मी तेथे हजर नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की माझे पती त्यांच्या व्यवसायातील व्यवहाराबाबत माझेशी चर्चा करित नसे. हे म्हणणे बरोबर आहे की मला दाखविण्यात आलेले नि. २३ सोबत दाखल केलेले फोटोग्राफ हे दाव्यातील जागेचे आहे. (The learned Advocate for the plaintiff submits for exhibiting the three photographs shown to and admitted by above witness. The learned Advocate for the defendants object to such exhibition, contending that plaintiff has filed those photographs and were marked as Article and therefore, it is for the plaintiff to prove those photographs.

The above witness was shown above photographs Article-A,B and C. She has identified the place shown in those photographs and has admitted it to be of suit property. In view of such admission, above documents need to be admitted in evidence by marking it as exhibit. Above photographs therefore, are marked as **Exh. 121 to 123** respectively. )

४. माझे पती बांधकामाचा व्यवसाय केंव्हापासून करित होते हे मी सांगू शकत नाही. त्यांनी फक्त दोन ठिकाणी बांधकाम केले होते. हे म्हणणे बरोबर आहे की त्यांनी सदरहू बांधकामात फ्लॅट्स व गाळे बांधून विक्री केले. हे मला माहित नाही की त्यांना वरिल बांधकामाचे व्यवसायाचा अंदाजे ३५ वर्षांचा अनुभव होता.

५. हे म्हणणे बरोबर आहे की वादी संस्था हे उमरेड येथील जुनी संस्था आहे. हे म्हणणे बरोबर आहे की माझे पती वास्तु विहार नावाने प्लॉटचे व्यवहार करित होते. हे म्हणणे बरोबर आहे की माझे पती निश्चित कोणते व्यवहार करित होते याबाबत मला निश्चितपणे माहिती नाही. हे म्हणणे बरोबर आहे की माझे पती यांचे वादी सोसायटीसोबत निश्चित कोणता व्यवहार झाला व काय लिखापढी झाली याबद्दल मला

माहिती नाही. मला नोटीस नि. ५६, ५७, ९७ व १०४ मधील मजकूर निश्चितपणे माहिती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की सदर नोटीसा इसार रद्द झाल्याबाबतच्या आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की मी नोटीस नि. ५६, ५७, ९७ व १०४ कधीही वाचल्या नाहीत. हे म्हणणे बरोबर नाही की वादी संस्थेमध्ये माझा अकाउन्ट होता. हे मला माहित नाही की वादी संस्थेत माझे पतीचे अकाउन्ट होते किंवा कसे. हे म्हणणे बरोबर नाही की मी व माझे पतीने वादी संस्थेकडून कर्ज घेतले होते. हे म्हणणे बरोबर आहे की माझे पतीचा वादी संस्थेसोबत कर्जाबाबत काय व्यवहार झाला याची मला माहिती नाही. हे मला माहित नाही की माझे पतीने वादी सोसायटीला विक्रीपत्र करूनदेण्याचे नाकारल्याचे कारण मला माहित नाही. हे म्हणणे बरोबर आहे की वादी संस्थेचे ऑफिस हे वादातील मालमत्तेसमोर मंगळवारीपेठ, उमरेड येथे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की माझे पतीने वादी संस्थेशी ऑफिस ब्लॉक विक्रीचा करारनामा केला होता. हे मला माहित आहे की वादातील मालमत्तेत अरूणोदय-२ बिल्डींग मध्ये खालच्या मजल्यावर ४ दुकाने व १ ऑफिस ब्लॉक आहे.

६. हे म्हणणे बरोबर आहे की माझे पती उमरेड येथे पुर्वी नगरसेवक होते. हे म्हणणे बरोबर आहे की ते व्यवहाराबाबत चोख होते. हे म्हणणे बरोबर आहे की ते कागदपत्रांवर सह्या करण्यापुर्वी वाचून घेत होते. हे मला माहित नाही की वादातील मालमत्तेबाबत वादातील मालमत्तेचा नकाशा तयार झाल्यानंतर माझे पतीने पुर्नमंजूरीसाठी नकाशा पेश केला होता. माझे पतीने वादी सोसायटीस ५०० चौ.फिट चा ऑफिस ब्लॉक देण्याचा सौदा केला होता, परंतु सोसायटीस जास्त जागा पाहिजे होती व ती देणे शक्य नव्हती, अशी मला माहिती आहे. हे म्हणणे बरोबर आहे की माझे पती व सोसायटीतील अधिकारी यांच्यामध्ये वादातील मालमत्तेबाबत सौदा झाला तेंव्हा मी तेथे उपस्थित नव्हते. हे म्हणणे बरोबर नाही की माझे पतीने वादी सोसायटीस ९८५ चौ. फुट चा ऑफिस ब्लॉक देण्याकरिता मान्य केले होते. हे मला माहित नाही की माझे पतीने अरूणोदय-२ स्किम बाबत वेगवेगळया जाहिराती दिल्या होत्या. हे म्हणणे बरोबर आहे की त्यांनी मला अरूणोदय-२ बिल्डींगमधील कोणता गाळा किती चौ.फुटाचा राहिल

हे सांगीतले नव्हते. हे म्हणणे बरोबर नाही की माझे पतीने वादी सोसायटीस ९८५ चौ. फुटाची मंजूरी घेईल असे सांगीतले होते. माझे पतीकडे बांधकामाबाबत परवाना होता किंवा कसे हे मला माहित नाही. मी घरकाम करित असल्याने मला त्यांच्या व्यवहाराबाबत ते सांगत नसे. मला माझे पतीने त्यांना वादी सोसायटीने इसाराबाबत किती पैसे दिले हे सांगीतले नव्हते. मला माझे पतीने एकूण विक्री मोबदला किती होता हे सांगीतले नव्हते. माझे पतीने मला विक्रीसंबंधी केंव्हा व किती पैसे द्यावयाचे आहेत हे सांगीतले नव्हते. हे म्हणणे बरोबर नाही की आज घडीला वादातील मालमत्तेतील ऑफिस ब्लॉकचे क्षेत्रफळ ८३० चौ.फुट बांधून तयार आहे. मला वादातील मालमत्तेची जागा मोजण्याचा प्रसंग आला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की वादातील ऑफिस गाळा हे ५०० चौ.फुटाचे आहे याचे मला ऐकीव माहिती आहे. मी वाद जागेचा मंजूर नकाशा बघीतलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की मंजूर नकाशानुसार व मौक्यावर वाद गाळा किती चौ.फुटाचा आहे हे मी सांगू शकत नाही. वादातील गाळा क्र. ३ व ४ चे मागे किंवा पुढे काय आहे किंवा कसे हे मी सांगू शकत नाही परंतु वाद गाळा हा शेवटी आहे.

७. वादातील इमारतीच्या बांधकामास केंव्हा सुरूवात झाली हे मला माहिती नाही. माझे पतीने सदरहू व्यवहाराबाबत काय पत्रव्यवहार केला याची मला माहिती नाही. हे मला माहित आहे की माझे पतीने इसाराच्या रकमेव्यतिरिक्त उर्वरित रकमेची मागणी वादी सोसायटीला केली होती. हे मला माहित नाही की वादातील करारनामा खोटा आहे या आशयाची नोटीस माझे पतीने दिली नाही. हे मला माहिती नाही की माझे पतीचा वादीशी वाद मालमत्तेबाबत वाद प्रथम केंव्हा उपस्थित झाला होता. हे मला माहित नाही की माझे पतीला नागपूर नागरी सहकारी बॅंक कडून ७,५०,०००/- रूपये मिळाले होते. हे म्हणणे बरोबर नाही की सदरहू रक्कम माझे व माझे पतीचे वादी संस्थेतील कर्ज खात्यात जमा करण्यात आले होते. माझे पतीने वादी संस्थेला व्याजासकट चेक द्वारे ८,२७,१००/- रूपये दिले होते. हे मला माहित नाही की वादी संस्थेत माझे कर्ज खात्याचा क्र. १३३२ व माझे पतीचा कर्ज खात्याचा क्र. ९५४ होता. मला

दाखविण्यात आलेले पेईंग स्लिप नि. ७८ वर माझे पतीची स्वाक्षरी आहे. हे म्हणणे बरोबर आहे की माझे पतीने माझे समक्ष वादी संस्थेत रक्कम जमा केली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतात की त्यांच्या पतीने त्यांना सांगून सदर रक्कम वादी संस्थेकडे जमा केली होती. हे मला माहित नाही की माझे पतीने वादी संस्थेविरूध्द त्यांच्या कर्ज खात्यात बेकायदेशिरपणे पैसे वळविले या आशयाची तक्रार दाखल केली नव्हती. हे मला माहिती नाही की करारनामा रद्द झाल्याबातचे दस्त वादीकडून तयार करण्यात आले होते किंवा कसे.

(दुपारचे २.०० वाजत असल्यामुळे उलट-तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृती |
| स्वा/- | स्वा/- |
| (अ.वि.मिश्रा)<br>दिवाणी न्यायाधीश व.स्तर<br>उमरेड<br>दि. २७.०९.२०२२ | (अ.वि.मिश्रा)<br>दिवाणी न्यायाधीश व.स्तर<br>उमरेड |